पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/०९/२०१४** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०५/०९/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
५) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
६) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
८) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे, मा.डॉ.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.साळवी - कार्यकारी अभियंता, मा.पाटील - प्रशासन अधिकारी (आस्था) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**अ)** दिनांक ०७/०३/२०१४, २१/०३/२०१४, ०४/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**आ)** दिनांक ०४/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**इ)** दिनांक १९/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ई) दिनांक १६/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

उ) दिनांक १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ऊ) दिनांक २०/०८/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : २८ विषय क्रमांक : १

दिनांक : ०५/०९/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.समीर मासुळकर

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

२) मा.आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/०७/कावि/६२१/२०१४, दिनांक ०१/०९/२०१४

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

मा.आयुक्त यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.१ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २९ विषय क्रमांक : २

दिनांक : २०/०८/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

२) मा.आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/०७/कावि/६२०/२०१४, दिनांक ०१/०९/२०१४

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नविन पदांच्या पद निर्मितीबाबत...

मा.आयुक्त यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.२ कामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३०  विषय क्रमांक : ३

दिनांक : ०५/०९/२०१४

सुचक : मा.समीर मासुळकर  अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव -

विषय - प्रभाग क्र.६ मोशी येथील प्रस्तावात नमुद केलेल्या कामांना सुधारित तरतुदीप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत....

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३१  विषय क्रमांक : ४

दिनांक : ०५/०९/२०१४  विभाग : क क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.शकुंतला बनसोडे  अनुमोदक : मा.विमल जगताप

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षे/स्था/४/कावि/१२१२/२०१४, दि.१६/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

प्रभाग क्र.६३ रेल्वे गेट ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत नाला करणेचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे र.रु.४९,५३,३५३/-(अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख त्रेपन्न हजार तिनशे त्रेपन्न फक्त ) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे तसेच विशेष योजना या लेखाशिर्षातील पानांक ४० अ.क्र.११९ वरील नाशिक फाटा उड्डाणपूल येथे पादचा-यांसाठी एफ.ओ.बी. व इतर अनुषंगिक कामे करणे या कामावरील र.रु.२५,००,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच प्र.क्र.३८ नेहरुनगरमधील कै.वसंतदादा पाटील शाळेमागील नाल्याची खोली वाढविणे मागील कामाचे आदेश मे.श्री कन्स्ट्रक्शन यांना आदेश क्र.स्था/नि/३क/कावि/२७७/२०१३, दि.३०/११/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदर कामाची निविदा र.रु.१४,९६,६५२/- इतकी आहे व निविदा दर ३३.३४९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर कामाचा सुधारित खर्च ४९,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) यांना भाववाढ फरका सह मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३२  विषय क्रमांक : ५

दिनांक : ०५/०९/२०१४  विभाग : स्थापत्य ड मुख्यालय

सुचक : मा.समीर मासुळकर  अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जा.क्र.स्था/डमु/३५७/२०१४, दि.१६/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.४३ पिंपरी येथे जिजामाता हॉस्पिटलची नवीन इमारत बांधणेकामीचे र.रु.३८,४४,००,०००/- (अक्षरी र.रु.अडतीस कोटी चौव्वेचाळीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे कामा करण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे

शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३३ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०५/०९/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५६९/२०१४, दिनांक - २२/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.गावडे दिलीप काशिनाथ यांना खुला या प्रवर्गामधून सह आयुक्त या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६९०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३४ विषय क्रमांक : ७

दिनांक : ०५/०९/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५७३/२०१४, दिनांक - २२/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.गट्टूवार देवन्ना नरसिमल्लू यांना अनु.जमाती या प्रवर्गामधून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३५ विषय क्रमांक : ८

दिनांक : ०५/०९/२०१४ विभाग : प्रशासन

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५७०/२०१४, दिनांक - २२/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

श्री.गवळी संजय जनार्दन यांना खुला (अनु.जमाती) या प्रवर्गामधून उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखापरिक्षक) या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी तसेच श्री.संजय जनार्दन गवळी यांना खुला (अनु.जमाती) या प्रवर्गामधुन उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखापरिक्षक) या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.

६६०० या वेतनश्रेणीमध्ये मुख्यलेखापाल यांचे नियंत्रणाखाली महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.पीसीसी-३००५/३००७/प्र.क्र.२१५/२००५/नवि-२२, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १३ ऑक्टोंबर २०१० मध्ये नमुद केलेले अधिकार देणेसह पदोन्नती देणेस मान्यता देणेकरीता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३६ विषय क्रमांक : ९
दिनांक : ०५/०९/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५७१/२०१४, दिनांक - २२/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.देशमुख मनोज मोहन यांना खुला या प्रवर्गामधून वैद्यकीय अधिक्षक या पदावर वेतनश्रेणी र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० मध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३७ विषय क्रमांक : १०
दिनांक : ०५/०९/२०१४ विभाग : प्रशासन
सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.वसंत लोंढे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५७२/२०१४, दिनांक - २२/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.भगत प्रल्हाद कृष्णा यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ३८ विषय क्रमांक : ११
दिनांक : ०५/०९/२०१४ विभाग : स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक : मा.विमल जगताप
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/४०३/२०१४, दि. २५/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भूमकर चौक ते हिंजवडी (प्रजिमा ३१) रस्त्यावरील जकात नाक्याजवळील हिंजवडीनाल्यावर उर्वरित रुंदीचे सी.डी.वर्क्सचे काम धनेश्वर कन्स्ट्रक्शनच्या चालू असलेल्या निविदा क्र.१७/६-२०१३-१४

मधून केल्यास काम लवकर पुर्ण करता येणे शक्य असल्याने स्थळ बदल करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७७१/२०१४
दिनांक : १०/०९/२०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.